राज्य वस्त्रोद्योग धोरण २०११-१७
अंतर्गत स्व- अर्थसहाय्यीत वस्त्रोद्योग
प्रकल्पांना भांडवली अनुदान
वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक: बैठक -२०१९/प्र.क्र.३१४/टेक्स-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३० मार्च, २०१९

<u>वाचा</u> :-

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/प्र.क्र.१/टेक्स-२, दि. १ मार्च, २०१२
२) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. धोरण-२०१२/प्र.क्र.२५७/टेक्स-२, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४
३) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. धोरण-२०१५/प्र.क्र.१५१/टेक्स-५, दिनांक ०२/१२/२०१५
४) संचालक, (वस्त्रोद्योग), नागपूर यांची पत्रे.
५) वित्त विभाग, परीपत्रक, क्र.अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७/४/२०१५
६) शासन परीपत्रक, वित्त विभाग, क्रमांक संकिर्ण -२०१६/प्र.क्र.३१ /कोषा.प्रशा-५,दिनांक १०मे, २०१६
७) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३ दि.०२/०४/२०१८
८) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३ दि.२५/०१/२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

वरील संदर्भीय अनुक्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याच्या वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत स्व- अर्थसहाय्यीत वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान देण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट" मधील विवरणपत्रातील वस्त्रोद्योग घटकांना भांडवली अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

राज्यातील वस्त्रोद्योग धोरण २०११ - १७ वस्त्रोद्योग घटकांना स्व- अर्थसहाय्यीत वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान योजने अंतर्गत सचिव (वस्त्रोद्योग), यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पांना या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट" मधील विवरणपत्रानुसार एकूण रु. १,००,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी) इतकी रक्कम मंजूर करुन वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू वस्त्रोद्योग घटकांना वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली रक्कम योजनेच्या दिशानिर्देशानुसार या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या बँकांच्या खात्यावर RTGS/NEFT द्वारे वितरीत करण्यात यावी.

३. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली भांडवली अनुदानाची रक्कम संबंधित वस्त्रोद्योग घटकाच्या खात्यात जमा झाल्यानंतर त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास वेबसाइटवर संबंधित वस्त्रोद्योगाने ऑनलाईन सादर करावे.

४. वरील प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम संबधित वस्त्रोद्योगाला वितरीत करण्याकरीता श्री.र.गं.बोड्डू, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच श्री. ब.बा.चव्हाण, सह सचिव(वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई, (उपसचिव (Spinning Mills) V०००९) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या आदेशाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई येथून आहरीत करुन ती सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेल्या बँकेला वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. यावर होणारा खर्च " मागणी क्रमांक व्ही-२, २८५१- ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था (०२) (७७) राज्य वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत स्व-अर्थसहाय्यीत वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान (२८५१ ६५५६) (कार्यक्रम) ३३, अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. शासन परीपत्रक, वित्त विभाग, क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक २ एप्रिल,२०१८ अन्वये, ३३ अर्थसहाय्य या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परीपत्रकातील परिछेद ६ ते १० पैकी ६ अ,२,७ (१)(अ)(आ), ७(२),७(३), ७(४),७(५),७(६),७(७),७(८),७(९) या प्रकरणी लागू नाही. तसेच या परिपत्रकातील परिच्छेद ६ब, ६क,८ व ९ मधील या प्रकरणी लागु असलेल्या अटींची तसेच या परिपत्रका सोबतच्या परिशिष्ट मधील तपासणी सूचीप्रमाणे (अनुक्रमांक ८) सर्व बाबींची सदर प्रकरणी पुर्तता होत आहे.

सदर योजनेखाली निधी वितरित करण्यास वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३ दि. २५/०१/२०१९ अन्वये परवानगी दिली आहे. सदर मान्यतेस अनुसरून निधी वितरीत करण्यात येत आहे. या योजनेखाली निधी वितरीत करताना उपरोक्त शासन परिपत्रकातील परि. ५ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

७. सदर योजना ही नियमित राज्य योजनांतर्गत योजना असल्याने व “अर्थसहाय्य” या शिर्षाखाली अर्थसहाय्य वितरण असल्याने, शासन परीपत्रक, वित्त विभाग, क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक २ एप्रिल,२०१८ च्या परिशिष्टातील अनु.क्र.१,२,५,६,७ मधील तरतूदीनुसार या प्रकरणी नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही.

८. सदर योजनेच्या स्वरुपात अथवा व्याप्ती मध्ये बदल होत नसल्याने, शासन परीपत्रक, वित्त विभाग क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक २ एप्रिल,२०१८ च्या परिशिष्टातील अनु.क्र.३ व ४ मधील तरतूदीनुसार नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही.

९. वित्त विभाग, परीपत्रक, क्र.संकिर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दि.१०/०५/२०१६ च्या परिशिष्ट-अ मधील अनु.क्र.१ ते ९ संदर्भातील तपासणी सुची मधील याप्रकरणी लागु असलेल्या मुद्द्यांची पुर्तता होत आहे. सदर परीपत्रकानुसार परिशिष्ट-अ मधील अनु.क्र.१ ते ९ संदर्भातील माहीती खालील प्रमाणे आहे-

१) **विभागास प्रदान वित्तीय अधिकार :-** वित्त विभाग, परीपत्रक क्र.अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७/४/२०१५ अन्वये ३३ अर्थसहाय्य या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परीपत्रकातील तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची सदर प्रकरणी पुर्तता होत आहे.

२) **मंजूर निधी :-** "मागणी क्रमांक व्ही-२, २८५१- ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था (०२) (७७) राज्य वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत स्व-अर्थसहाय्यीत वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान (२८५१ ६५५६) (कार्यक्रम) ३३, अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षासाठी रू.३२०.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित झाला आहे. त्यापैकी रू.०.०० लक्ष यापुर्वी खर्च करण्यात आला आहे व रू.२२०.०० लक्ष निधी शिल्लक आहे त्यापैकी रू.१००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात येत आहे.

३) मागील ३ महिन्यापूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे :- होय

४) ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे, त्या लेखाशिर्षाअंतर्गत १ वर्षापुर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही :- या योजनेखाली १ वर्ष जुने संक्षिप्त देयक त्याच लेखाशिर्षाखाली प्रलंबित नाही.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देतांना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यांत आली आहे :- लागू नाही.

६) वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करतांना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे:-लागू नाही

७) बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देतांना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा :- लागू नाही.

८) अधिनस्त कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमीत करण्यापुर्वी अशा खरेदीसाठी रीतसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढावेत :- लागू नाही.

९) खरेदी विषयक प्रक्रीया अद्यावत संबंधीत शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा :-लागू नाही.

१०. शासन परीपत्रक, वित्त विभाग क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक २ एप्रिल,२०१८ च्या परिशिष्टातील अनु.क्र.८ संदर्भातील तपासणी सुची मधील याप्रकरणी लागु असलेल्या मुद्द्यांची पुर्तता होत आहे.सदर परीपत्रका सोबतच्या परिशिष्ठातील अनु.क्र.८ संदर्भातील माहीती खालील प्रमाणे आहे :-

१) योजनेस प्रशासकिय मान्यता - शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. धोरण-२०१५/प्र.क्र.१५१/टेक्स-५, दिनांक ०२/१२/२०१५ नुसार योजनेस प्रशासकिय मान्यता आहे.

२) निधी वितरण शासन निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता झाल्या नंतरच होणार आहे.- शासन निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता होत आहे.

३) यापूर्वी वितरीत केलेल्या ७५ % निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र- लागू नाही. प्रथमच अनुदान वितरीत करण्यात येत आहे.

४) यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत:- सद्य:स्थितीत नाहीत.

५) निधी लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा होणार आहे :- सदर योजने अंतर्गत योजनेतील तरतुदीनूसार निधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केला जातो.

६) वस्तु खरेदी करण्यापुर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची नोंद Dead Stock रजिस्टर मध्ये घेण्यात आली असून त्याचा योग्य वापर झाला असून त्या पडून नाहीत, असे प्रमाणपत्र:-लागू नाही.

७) यामधून खरेदी करण्यापुर्वी खरेदी असल्यास प्रत्यक्ष वस्तु प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयके अदा केले जाणार आहे. :- लागू नाही.

८) आवश्यक त्या ठिकाणी आदीवासी सामाजिक न्याय यांची निधी वितरणास सहमती आहे :-लागू नाही.

९) प्रस्तूत योजनेत संक्षिप्त देयक प्रलंबित नाही :-कुठलेही देयक प्रलंबित नाही.

१०) निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे - होय.

११. सदर शासन निर्णय, संदर्भिय अ.क्र. २ येथील शासन निर्णयान्वये सचिव(वस्त्रोद्योग), यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या संपन्न झालेल्या बैठकीत मंजूर वस्त्रोद्योग प्रकल्पांच्या दाव्यांना मिळालेल्या मान्यतेनुसार सुधारीत अंदाज २०१८-१९ नुसार खर्चास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१२ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३३०१६२६१८१७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Baliram Balu Chavhan

Digitally signed by Baliram Balu Chavhan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Cooperation, Marketing and Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e273e36b99be5b14489b31a9c2811b8b229d82eaf6b80e127184b883aeff30f8, serialNumber=d5d3bee863c8e1cd0b4387e83a935e72bfd969e5d5643a5a628f7516c192e220, cn=Baliram Balu Chavhan
Date: 2019.03.30 16:29:49 +05'30'

(ब.बा.चव्हाण)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
२. महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५. अ.मु.स. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई(ई-मेलद्वारे)
६. अ.मु.स. वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई(ई-मेलद्वारे)
७. सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई.(ई-मेलद्वारे)
८. संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.(ई-मेलद्वारे)
९. सह सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई
१०. अवर सचिव (१७-स), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई
११. कार्यासन अधिकारी (रोखशाखा) (३ प्रती), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई
१२. वस्त्रोद्योग प्रवर्तक, परिशिष्टामधील वस्त्रोद्योग घटक (ई-मेल व्दारे)

शासन निर्णय क्रमांक: बैठक -२०१९/प्र.क्र.३१४/टेक्स-५, दिनांक :- ३० मार्च, २०१९ सोबतचे "परिशिष्ट"

Self Finance Scheme (Partial Payment)			
Bank Name	Union Bank Of India	**Account Number**	495805010040481
Account Name	Indo Count Industries Limited	**IFSC Code**	UBIN0549584
Sr.No	**UID No**	**Unit Name**	**Subsidy Amount Rs. In Lakhs**
1	SF/2017/10001	Indo Count Industries Limited	44.32
2	SF/2017/10002	Indo Count Industries Limited	37.87
3	SF/2017/10003	Indo Count Industries Limited	17.81
		Total	**100.00**

Total Subsidy Amount Rs. In Lakhs: 100.00